# वायदा बाजारातील जीवनावश्यक वस्तूंची उलाढाल

## एक दृष्टिक्षेप



सध्या आपल्याला सर्वात जास्त भेडसावणारा प्रश्न म्हणजे महागाई. या महागाईचा एक घटक म्हणून वायदा बाजारातील जीवनावश्यक वस्तूंच्या उलाढालीवर बंदी आणावी असा मतप्रवाह आहे. या लेखात आपण ही उलाढाल महागाईस कशी कारणीभूत ठरते व त्यावर काही उपाय आपण बघणार आहोत. कदाचित हा लेख प्रसिद्ध होईस्तोवर ही बंदी लागू झालीही असेल अशी आपण आशा करूया!

स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये शेतीमालावरील वायदा व्यवहारांना बंदी घालण्यात आली ती २००२ पर्यंत लागू होती. २००२ नंतर सरकारने इलेक्ट्रॉनिक वायदा बाजारांना परवानगी देण्यास सुरुवात केली. यानंतर त्यामध्ये उलाढाल होणाऱ्या शेतीमालांची संख्या वाढतच गेली. या वायदा व्यवहारांचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ शकतो. उदा. नोव्हेंबरमध्ये गव्हाचा दर प्रति क्विंटल रुपये २००० आहे व मला माझ्या शेतात गव्हाची लागवड करायची आहे तर मी एप्रिल महिन्याचा वायदा व्यवहार करून समजा २१०० रुपये प्रति क्विंटल असा भाव नक्की करेन. म्हणजे एप्रिल महिन्यामध्ये कितीही भाव असला तरीही मला २१०० रुपये प्रति क्विंटल मिळणार आहेच. या ठरलेल्या भावानुसार मी माझा उत्पादनाचा खर्च मर्यादित ठेवून मला आवश्यक असणारा नफा मिळवू शकतो. एक हुशार शेतकरी आपले उत्पादन २०० क्विंटल असेल तर १०० क्विंटल अशा प्रकारे वायदा व्यवहारामध्ये लावेल व उरलेले त्या दिवशी जो भाव असेल त्या भावाला विकेल. समजा वाईट हवामानामुळे संपूर्ण २०० क्विंटलचे उत्पादन नाही झाले तरी फक्त १०० क्विंटलचा वायदा असल्यामुळे तसा तो निश्चिंत असेल. पण हा झाला व्यवहार जो करायला व समजायला सोपा आहे. पण प्रश्न येतो की, एप्रिल महिन्यात भाव किती असेल हे कुणालाच एप्रिल महिना आल्याशिवाय सांगता येत नाही. समजा, एप्रिल महिन्यात भाव १८०० रुपयांपर्यंत खाली आला तर काय होईल? शेतकऱ्याला वायदा व्यवहारामुळे १०० क्विंटलसाठी प्रति क्विंटल २१०० असा भाव नक्की मिळेल व उरलेले १०० क्विंटल कसे विकायचे ते त्याच्या हातात राहील. पण वायदा व्यवहारामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनाची जोखम (हवामानावर अवलंबून असल्यामुळे) व शेतमालाच्या किमतीची जोखीम (किमतीत चढउतार असल्यामुळे) निश्चितच कमी झाली आहे.

खरा सट्टा चालू होतो तो त्याच्यानंतर! ज्या व्यापाऱ्याने १०० क्विंटल गहू २१०० रुपये प्रति क्विंटलने घेतला आहे तो त्याच्या कुवतीनुसार लगेच बाजारामध्ये विकून टाकू शकतो व ३०० रुपये प्रति क्विंटलचे नुकसान सहन करू शकतो किंवा जर शक्य असेल (तेवढे सुसज्ज कोठार व साठवण्याचा खर्च परवडणारा असेल) व दुसरा व्यापारी तयार असेल तर त्या मालाची विक्री पुढे ढकलू शकतो. हा झाला नुकसानीचा लेखाजोखा. त्यात ही भाववाढीची बीजे रोवली गेली आहेत. पण एप्रिल महिन्यामध्ये भाव जर २२०० रुपये (मधल्या काळात मंत्र्यांची विधाने व सरकारची चुकीची धोरणे यामुळे) असेल तर काय होईल, याची नुसती झलकच पुरेशी आहे.

आपला शेतकरी वायदा बाजारात पुन्हा शिरेल व उरलेल्या १०० क्विंटलसाठी (साठवणीची क्षमता असेल तर नक्कीच) अजून एक वायदा व्यवहार मे महिन्यासाठी करेल व अधिक नफा कमवेल. जर साठवणीची क्षमता नसेल तर लगेच खुल्या बाजारात कुठल्या तरी व्यापाऱ्याला घाऊक विक्री करेल. पुन्हा जर व्यापाऱ्याकडे साठवणीची क्षमता असेल तर तो साठा करून ठेवेल अन्यथा थोड्या अधिक भावाने किरकोळ विक्रीसाठी आलेला माल आपल्याला मिळेल. सुदैवाने शेतीमाल नाशवंत असल्यामुळे तो जास्त दिवस साठवून ठेवता येणार नाही. अशा प्रकारे वायदा अधिकृत असेल तर सरकार त्याला विरोधही करू शकत नाही. हा वायदा पूर्ण करण्यासाठी जर कुणी वस्तूंचा साठा करत असेल तर तोही पूर्णपणे अधिकृतच आहे.

कंपनीच्या समभागांची खरेदी व विक्रीही अशाच पद्धतीने वायदा शेअर बाजारात होते. पण सुदैवाने आपण कंपन्यांचे समभाग रोजच्या जेवणात खात नाही! अशा प्रकारे कंपनीच्या समभागांची किंमत वाढली तर ते घ्यायचे किंवा नाही असा पर्याय आपल्याकडे उपलब्ध असतो. पण रोजच्या जेवणात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंना हा पर्याय उपलब्ध नसतो. त्यामुळे कंपनीचे समभाग ज्या पद्धतीने खरेदी- विक्री केले जातात त्या पद्धतीने जीवनावश्यक वस्तूंची खरेदी विक्री केली जाऊ शकत नाही.

कधी आपण साबणाच्या किमती गगनाला भिडल्या असे ऐकत नाही याचे कारण म्हणजे उत्पादन झाल्यावर त्याची किंमत लगेचच आदर्श वजन व परिमाण कायद्यानुसार वेष्टनावर छापावी लागते. साबणासारख्या छोट्या वस्तूंच्या विक्री किमतीवरही सरकारचे नियंत्रण आहे तर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे सरकारला का शक्य नाही? याबाबतीत सरकार अजूनही उदासीनता का दाखवत आहे?

एक अजून महत्त्वाची तुलना इकडे करावीशी वाटते ती औषधांच्या किमतीशी. गेल्या काही दिवसांमध्ये बऱ्याचशा वस्तूंच्या किमती काही पटींनी वाढल्या आहेत, पण औषधांच्या किमतीत मात्र किरकोळच वाढ झाली आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या किमतीवर असणारे सरकारचे नियंत्रण. औषधे बनवणाऱ्या कंपन्यांच्या उत्पादनाच्या खर्चांची दरवर्षी हिशेबतपासणी (कॉस्ट ऑडिट) केली जाते. यामुळे औषधांच्या किमती वाढवण्यापूर्वी सर्व कंपन्यांना केंद्रीय औषध किमती प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घ्यावी लागते. अशा प्रकारची रचना सरकारला शेतीमध्ये आणणे सहज शक्य आहे. सुरुवातीला अशा प्रकारची रचना फक्त अधिक उलाढाल असणाऱ्या शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना लागू करता येऊ शकते. अर्थात याला सुरुवातीला प्रचंड विरोध होईल आणि तेवढी राजकीय इच्छाशक्ती सरकारकडे असावी लागेल. या रचनेचा उपयोग करून पुढे- मागे शेतीवर कर लावण्यासही होऊ शकतो. या रचनेची अंमलबजावणी करताना सध्या लघुउद्योगांना असणाऱ्या रचनेचा अभ्यास उपयोगी ठरेल. अशा प्रकारे खर्चाच्या ठेवलेल्या नोंदीचा भविष्यातील खर्चाच्या व्यवस्थापनासाठीदेखील शेतकऱ्यांना खूप उपयोग होईल. हवामानामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई मिळवतानादेखील अशा प्रकारे ठेवलेल्या नोंदी उपयोगाला येतील. या उपायामुळे दूरच्या भविष्यात याचा चांगला उपयोग होईल, पण सध्याच्या परिस्थितीमध्ये संयुक्त संसदीय समितीच्या अहवालानुसार जीवनावश्यक वस्तूंची वायदा बाजारातील उलाढाल जोपर्यंत आपण या उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण होत नाही तोपर्यंत बंदच ठेवली पाहिजे.


• प्रा. आशीष थत्ते

ashishpthatte@gmail.com